पोलीस अधीक्षक कार्यालय,गडचिरोली,
दिनांक : १७/०९/२०१८

# वार्तापत्र

## ‘पोलीस दलाकडुन आश्रमशाळेस शालेय साहित्याचे वाटप’

आज रोजी मा. अपर पोलीस अधीक्षक, नक्षल सेल डॉ. मोहितकुमार गर्ग यांनी जिल्हयातील आरमोरी तालुक्यातील ‘**प्रिती आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा**’ आरमोरी येथे सदिच्छा भेट देवुन शाळेतील विदयार्थ्यांना शैक्षणिक तसेच भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. त्याच बरोबर उपस्थित विदयार्थ्यांसोबत प्रश्नोत्तर स्वरूपात वार्तालाप करून विदयार्थ्यांना असणाऱ्या अडीअडचणी समजुन घेतल्या व त्यांच्या शंकाचे निरसन केले. तसेच सदर भेटीदरम्यान त्यांनी विदयार्थ्यांना वहया, शालेय गणवेश, जेवणाचे डबे इत्यादी शालेय साहित्याचे वाटप केले.

याप्रसंगी विदयार्थ्यांना पोलीस दलातर्फे खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रभारी अधिकारी पोस्टे आरमोरीचे पोनि अजित राठोड सा., प्रोपोगंडा शाखेचे पोउपनि अवधुत शिंगारे, नागरी कृती शाखेचे पोउपनि अतुल खंदारे व शिक्षकवृंद आदि उपस्थित होते.




प्रिती आदिवासी माध्य.आश्रमशाळा आरमोरी
ता. आरमोरी. जि. गडचिरोली.
गौरी
विद्या मंदिर
यावे ज्ञानासाठी.
निघावे सेवेसाठी.
2018-9-17 11:23